**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.०५/०६/२०२६

***जागतिक पर्यावरण दिनानिमित महानगरपालिकेमार्फत वृक्षारोपण संपन्न***

दि.०५ जून "जागतिक पर्यावरण दिनानिमित्त" वसई विरार शहर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण विभागाच्या वतीने व राष्ट्रीय स्वच्छ वायू कार्यक्रम (NCAP) तसेच माझी वसुंधरा अभियानाअंतर्गत शहर हरित, व पर्यावरणपूरक बनविण्याच्या उद्देशाने दिनांक ०५ जून २०२६ रोजी महानगरपालिका मुख्यालयाच्या ठिकाणी वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मान्यवरांच्या हस्ते विविध प्रकारच्या वृक्षांचे वृक्षारोपण करून उत्साहपूर्ण वातावरणात सदर कार्यक्रम संपन्न झाला. पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती निर्माण करणे, हरित क्षेत्र वाढविणे तसेच नागरिकांमध्ये वृक्षसंवर्धनाची भावना रुजविणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. महानगरपालिकेच्या वतीने आयोजित या वृक्षारोपण कार्यक्रमात मा.महापौर श्री.अजीव पाटील, मा.उप-महापौर श्री.मार्शल लोपीस, मा.आयुक्त श्री.पृथ्वीराज बी.पी.(भा.प्र.से.), मा.सभागृह नेते श्री.प्रफुल्ल साने, मा.विरोधी पक्षनेते श्री.मनोज पाटील, सन्माननीय नगरसेवक-नगरसेविका, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे, उप-आयुक्त श्रीम.अर्चना दिवे, उप-आयुक्त श्रीम.स्वाती देशपांडे तसेच महानगरपालिकेचे अधिकारी-कर्मचारी सहभागी झाले होते.

महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणीही टप्प्याटप्प्याने वृक्षारोपण करण्यात येत असून रस्त्यांच्या दुतर्फा जागा तसेच मोकळ्या भूखंडांवर प्रामुख्याने विविध देशी वृक्षांच्या रोपांची लागवड करण्यात येत आहे. पिंपळ, वड, कडुलिंब, बहावा, जांभूळ, करंज, आवळा यांसारख्या पर्यावरणपूरक व दीर्घायुषी वृक्षांना लागवडीसाठी प्राधान्य देण्यात आले आहे. स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार महानगरपालिका क्षेत्रात उपलब्ध जागांवर (गृह संकुल, क्रीडांगणे, खाजगी मोकळ्या जागा इ.) वृक्ष लागवड करण्यासाठी 'वृक्ष दत्तक योजने' अंतर्गत महानगरपालिका वृक्षप्राधिकरण विभागामार्फत वृक्ष उपलब्ध करून देण्यात येत आहेत.
कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांकडून पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करताना वाढते प्रदूषण, हवामान बदल, ग्लोबल वॉर्मिंग आणि घटते हरित क्षेत्र यावर उपाययोजना म्हणून वृक्षारोपण ही काळाची गरज असून प्रत्येक नागरिकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन करण्यात आले.